# महाराष्ट्र विधानसभा

## आवाहनपत्र

क्रमांक : २२०५/अ,
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन,
मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १५ फेब्रुवारी, २०२४ / माघ २६, १९४५ (शके)

**प्रति,**

महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सदस्य (मंत्री महोदयांसह).

**महोदय/महोदया,**

कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांनी भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४ अन्वये त्यांना प्रदान केलेले अधिकार वापरून महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन, मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ११-०० वाजता मुंबई येथील विधान भवनात भरविण्याचे ठरविले आहे (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, अधिसूचना क्रमांक २२०३/अ, दिनांकित १५ फेब्रुवारी, २०२४ पहा). म्हणून, महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ३ अन्वये मी आपणांस विनंती करतो की, आपण वर नमूद केलेल्या वेळी मुंबई येथील विधान भवनात विधानसभेच्या अधिवेशनासाठी उपस्थित रहावे.

आपला स्नेहांकित,

**(जितेंद्र भोळे)**
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानसभा.

(शा.म.मु.) एचबी २९०१ (१०००—२-२०२४)